Epaper
डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल
MSME - MH-33 -0714843

दैनिक जन सम्राट टाईम्स
सत्याचे प्राईम्स
मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे

ISSF शूटिंग वर्ल्ड कपमध्ये भारताची सुवर्ण कामगिरी
(पान २ वर)



। मंगळवार, दि. २८ जूलै २०२६ । वर्ष १ । अंक ११० । पाने २ । Title Code - T/MH/2026/0422/5204/1306 DIGITAL EDITION

» Selected

### डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम स्मृतिदिना निमित्त वाचन करूया' उपक्रम



भुसावळ | सेकंडरी एज्युकेशन सोसायटी संचालित कला व विज्ञान महाविद्यालय, भालोद येथे भारतरत्न, माजी राष्ट्रपती तथा महान शास्त्रज्ञ डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या स्मृतिदिनानिमित्त राज्यशास्त्र विभागाच्या वतीने 'अर्धा तास वाचन करूया' या अभिनव उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये वाचन संस्कृती रुजावी, ज्ञानाची आवड निर्माण व्हावी आणि व्यक्तिमत्त्व विकासाला चालना मिळावी, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. विद्यार्थ्यांनी शांत वातावरणात विविध विषयांवरील पुस्तकांचे अर्धा तास मनोभावे वाचन केले.

## आमदारांच्या तक्रारींनंतर शिंदे ॲक्शन मोडमध्ये • मंत्र्यांच्या कामगिरीची होणार तपासणी

# शिंदे घेणार शिवसेना मंत्र्यांचा 'परफॉर्मन्स टेस्ट'!

## मंत्रिमंडळ बैठकीनंतर सर्व मंत्र्यांची तातडीची आढावा बैठक'; फेरबदलाचे संकेत?

जन सम्राट टाईम्स

**मुंबई । राज्यातील राजकीय घडामोडींना वेग आला असतानाच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शिवसेनेच्या सर्व मंत्र्यांची महत्त्वपूर्ण आढावा बैठक बोलावल्याने राजकीय वर्तुळात विविध चर्चांना उधाण आले आहे.**

राज्य मंत्रिमंडळाची बैठक संपल्यानंतर मंत्रालयाच्या सातव्या मजल्यावरील समिती सभागृहात होणाऱ्या या बैठकीत प्रत्येक मंत्र्यांच्या विभागाच्या कामगिरीचा सखोल आढावा घेतला जाणार असून, कामकाजाचा अहवाल, निर्णयांची अंमलबजावणी आणि भविष्यातील उद्दिष्टांवर चर्चा होणार आहे.केंद्रातील अलीकडील राजकीय घडामोडी, शिक्षण क्षेत्रातील प्रश्न आणि राज्यात विविध मुद्द्यांवर वाढलेले राजकीय वातावरण या पार्श्वभूमीवर सत्ताधारी अधिक सतर्क झाले आहेत. त्याचवेळी शिवसेनेच्या काही आमदारांनी आपल्या मतदारसंघातील विकासकामे



विविध विभागांकडून रखडत असल्याच्या तक्रारी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे केल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे. या पार्श्वभूमीवर ही बैठक विशेष महत्त्वाची मानली जात आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, प्रत्येक मंत्र्याने गेल्या दीड वर्षात आपल्या विभागात घेतलेले महत्त्वाचे निर्णय, त्या निर्णयांची अंमलबजावणी कितपत झाली, प्रलंबित कामे, योजनांची सद्यस्थिती आणि आगामी काळातील कृती आराखडा याबाबत सविस्तर सादरीकरण करायचे आहे. केवळ घोषणा न करता प्रत्यक्षात किती कामे पूर्ण झाली, यावर शिंदे विशेष भर देणार असल्याचे सांगितले जात आहे. या बैठकीत 'विकसित महाराष्ट्र-२०४७' या राज्य सरकारच्या महत्त्वाकांक्षी संकल्पनेअंतर्गत सन २०२६-२७ साठी विविध विभागांना देण्यात आलेल्या उद्दिष्टांचा आढावाही घेतला जाणार आहे. प्रत्येक विभागाने निश्चित केलेली उद्दिष्टे, त्यासाठीची प्रगती आणि अंमलबजावणीतील अडचणी याबाबत मंत्र्यांकडून माहिती घेतली जाणार आहे. राजकीय वर्तुळात सध्या मंत्रिमंडळ फेरबदलाच्या चर्चाही सुरू आहेत. अशा परिस्थितीत ही बैठक केवळ नियमित आढावा बैठक नसून मंत्र्यांच्या कार्यक्षमतेची चाचणी मानली जात आहे. कमी कामगिरी करणाऱ्या मंत्र्यांबाबत कठोर निर्णय घेतले जाऊ शकतात, अशीही चर्चा राजकीय वर्तुळात रंगू लागली आहे.

### विकासकामांना गती देण्यासाठी बैठक

या बैठकीकडे शिवसेना तसेच महायुतीतील नेत्यांचे विशेष लक्ष लागले आहे. सूत्रांच्या म्हणण्यानुसार, सर्व मंत्र्यांना विभागनिहाय निर्णय, योजनांची अंमलबजावणी, प्रलंबित प्रकल्प आणि आर्थिक खर्चाचा तपशील घेऊन बैठकीला उपस्थित राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. प्रत्येक विभागाची कामगिरी स्वतंत्रपणे तपासली जाणार असल्याने मंत्रीही बैठकीसाठी सज्ज झाले आहेत. राज्यातील प्रशासन अधिक गतिमान करण्यासाठी आणि विकासकामांना गती देण्यासाठी ही बैठक महत्त्वाची ठरणार असल्याचे मानले जात आहे. बैठकीनंतर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे मंत्र्यांना कोणत्या सूचना देतात, प्रलंबित कामांबाबत काय निर्देश देतात आणि मंत्रिमंडळ फेरबदलाबाबत काही संकेत मिळतात का, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

## अनुसूचित जातींच्या उपवर्गीकरण: जळगावात आंदोलन!

### जनगणनेपूर्वी उपवर्गीकरण करू नये

जन सम्राट टाईम्स

**जळगाव | प्रतिनिधी:** महाराष्ट्र शासनाने अनुसूचित जातींचे 'अ, ब, क, ड' असे उपवर्गीकरण करण्याच्या प्रस्तावित निर्णयाविरोधात रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट), जळगाव महानगरच्या वतीने मंगळवार, २७ जुलै २०२६ रोजी दुपारी १ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयासमोर जाहीर निदर्शने करण्यात आली. रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे जळगांव महानगर अध्यक्ष तथा मा. पुरवठा दक्षता समिती सदस्य, पोलिस समन्वयक समिती सदस्य, नगरसेवक जळगांव शहर महानगर पालिका अनिल अडकमोल यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन करण्यात आले.

यावेळी शासनाने जातीनिहाय जनगणना पूर्ण होण्यापूर्वी अनुसूचित जातींचे उपवर्गीकरण करू नये, अशी ठाम मागणी करण्यात आली. पक्षाच्या वतीने अपर जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देऊन प्रस्तावित उपवर्गीकरण प्रक्रियेला तात्पुरती स्थगिती देण्याची मागणी करण्यात आली. निवेदनात म्हटले आहे की, राज्य सरकारने अनुसूचित जातींतील ५९ जातींचे 'अ, ब, क, ड' अशा गटांमध्ये उपवर्गीकरण करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. मात्र, जातीनिहाय जनगणना झाल्याशिवाय अशा प्रकारचा निर्णय घेणे योग्य ठरणार नाही. उपवर्गीकरणामुळे अनुसूचित जातींमध्ये सामाजिक दरी वाढण्याची आणि जाती-जातींमध्ये मतभेद निर्माण होण्याची शक्यता असल्याचा दावा आंदोलनकर्त्यांनी केला. लोकशाही मार्गाने आंदोलन करत शासनाचे लक्ष या प्रश्नाकडे वेधण्याचा प्रयत्न असल्याचे आरपीआय (आठवले) पदाधिकाऱ्यांनी सांगितले. समाजात ऐक्य आणि सलोखा कायम राहावा, तसेच दलित समाजात फूट पडू नये. या आंदोलनात पक्षाचे जिल्हा सचिव भरत मोरे, भीमराव साळुंखे, प्रताप बनसोडे, दादाराव अडकमोल, अक्षय मोरे, हरीश शिंदे, मिलिंद अडकमोल, विमलबाई सपकाळे, मंगला कुमावत, सोनाली अडकमोल, उज्ज्वला अडकमोल, दिलीप अहिरे, रेखा बिन्हाडे, कमलबाई मोरे, सुनीता गाडे, शोभा सोनवणे, केशर सपकाळे, मंजुळाबाई बनसोडे, अनिता बोदडे, प्रभा ठाकूर, रत्नाबाई सपकाळे, नंदा बिन्हाडे, आक्का सोनवणे, लता भालेराव, रेखा शिराणे, कल्पना सुरवाडे, मंगला तायडे, प्रमिला गायकवाड, नंदा साळुंखे, कांता भालेराव, प्रमिला सपकाळे, सिंधू अडकमोल, आशा सपकाळे, रेखा अहिरे, राधा बाबर, रूपाली सपकाळे, दीपाली नरवाडे यांच्यासह मोठ्या संख्येने महिला व पुरुष कार्यकर्ते सहभागी झाले होते.

## मास्टर कीने मोटारसायकली चोरणारा अट्टल चोर जेरबंद; चार चोरीच्या दुचाकी हस्तगत

### पाचोरा गुन्हे शोध पथकाची धडक कारवाई; ₹१.२० लाखांचा मुद्देमाल जप्त

जन सम्राट टाईम्स

**पाचोरा | प्रतिनिधी :** पाचोरा पोलीस ठाण्याच्या गुन्हे शोध पथकाने वाहन चोरीच्या गुन्ह्यांचा यशस्वी तपास करत मास्टर कीच्या साहाय्याने मोटारसायकली चोरणाऱ्या अट्टल चोरट्याला अटक केली आहे. आरोपीकडून चोरीच्या चार बजाज प्लॅटिना मोटारसायकली जप्त करण्यात आल्या असून, जप्त मुद्देमालाची एकूण किंमत ₹१ लाख २० हजार आहे. जळगाव जिल्ह्यासह पाचोरा शहरात वाढत्या मोटारसायकल चोरीच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांनी चोरीचे गुन्हे उघड करून आरोपींना तातडीने अटक करण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यानुसार पोलीस निरीक्षक राहुलकुमार पवार यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शोध पथकाने तपासाची चक्रे वेगाने फिरवली. तपासादरम्यान मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार अमोल राजेंद्र ढमाळे (वय २७, रा. नंदीचे खेडगाव, ता. पाचोरा, ह.मु. काळे नगर, जळगाव)



हा जळगाव रोडलगत एका शेतातील शेडमध्ये लपून राहत असल्याचे निष्पन्न झाले. पोलिसांनी सापळा रचून त्याला ताब्यात घेतले. चौकशीत त्याने चार मोटारसायकली चोरी केल्याची कबुली दिली. तपासात आरोपी मास्टर कीच्या साहाय्याने विशेषतः बजाज प्लॅटिना मोटारसायकली चोरी करत असल्याचे समोर आले. त्याच्याकडून जप्त करण्यात आलेल्या चारही दुचाकी भडगाव, पाचोरा आणि एमआयडीसी वाळूज (छत्रपती संभाजीनगर) पोलीस ठाण्यांच्या हद्दीतून चोरीस गेल्याचे उघड झाले. या प्रकरणी भडगाव पोलीस ठाणे गुन्हा क्र. २३८/२०२६, पाचोरा पोलीस ठाणे गुन्हा क्र. ३४९/२०२६ व ३५०/२०२६ तसेच एमआयडीसी वाळूज पोलीस ठाणे गुन्हा क्र. ७१३/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता (BNS) कलम ३०३(२) अंतर्गत गुन्हे दाखल आहेत. ही उल्लेखनीय कारवाई पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे, अपर पोलीस अधीक्षक अशोक नखाते आणि उपविभागीय पोलीस अधिकारी बापू रोहम यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक राहुलकुमार पवार, सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रदीप शेवाळे, पोलीस उपनिरीक्षक कृष्णा घायाळ, पोहेका विलास पाटील, श्रीकांत गायकवाड, उमेश पाटील तसेच पोलीस कॉन्स्टेबल योगेश पाटील, संदीप पाटील आणि हरीश परदेशी यांच्या पथकाने यशस्वीपणे पार पाडली.

## चोपडा ग्रामीण पोलिसांची धडक कारवाई

### ७ किलोहून अधिक गांजा जप्त, तीन आरोपी जेरबंद

जन सम्राट टाईम्स

**चोपडा | प्रतिनिधी :** अमली पदार्थांविरोधातील विशेष मोहिमेअंतर्गत चोपडा ग्रामीण पोलिसांनी मोठी कारवाई करत ७ किलोहून अधिक गांजा जप्त केला आहे. या कारवाईत तीन संशयित आरोपींना अटक करण्यात आली असून, त्यांच्याकडून कार, दुचाकी, मोबाईल आणि गांजासह सुमारे ₹६ लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पोलिसांना मिळालेल्या गुप्त माहितीनुसार, लासूर-हातेड



महामार्गावरून अमली पदार्थांची बेकायदेशीर वाहतूक होणार असल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार चोपडा ग्रामीण पोलिसांनी तातडीने नाकाबंदी करून संशयित वाहनांची तपासणी सुरू केली. तपासणीदरम्यान संशयास्पद वाहनांची झडती घेतली असता त्यामधून ७ किलोहून अधिक गांजा आढळून आला. पोलिसांनी घटनास्थळावरून तिन्ही संशयितांना ताब्यात घेतले. या कारवाईत पोलिसांनी गांजासह गुन्ह्यात वापरण्यात आलेली एक कार, एक दुचाकी आणि मोबाईल फोन असा एकूण ₹६ लाखांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणी तिन्ही आरोपींविरुद्ध चोपडा ग्रामीण पोलीस ठाण्यात संबंधित कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, जप्त करण्यात आलेला गांजा कोठून आणण्यात आला होता आणि तो कोणाला विक्रीसाठी नेण्यात येत होता, याचा तपास पोलीस करीत आहेत. या प्रकरणामागील आंतरजिल्हा अथवा आंतरराज्य तस्करीच्या साखळीचाही शोध घेतला जात आहे.पोलिसांना मिळालेल्या गुप्त माहितीनुसार, लासूर-हातेड महामार्गावरून अमली पदार्थांची बेकायदेशीर वाहतूक होणार असल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार चोपडा ग्रामीण पोलिसांनी तातडीने नाकाबंदी करून संशयित वाहनांची तपासणी सुरू केली.

## बहुजन मुक्ती पार्टी देशात तिसऱ्या शक्तीची निर्मिती करीत आहे : मेश्राम

जन सम्राट टाईम्स

**पुणे | प्रतिनिधी :** बहुजन मुक्ती पार्टीचे चौथे राज्य अधिवेशन रविवारी (दि. २६ जुलै) पुण्यातील सावित्रीबाई फुले सांस्कृतिक भवन येथे उत्साहात पार पडले. या अधिवेशनाला महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांतील हजारो पदाधिकारी, कार्यकर्ते आणि बहुजन समाजातील प्रतिनिधी उपस्थित होते. अधिवेशनाचे उद्घाटन माजी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांच्या हस्ते झाले. अधिवेशनाच्या अध्यक्षस्थानी राष्ट्रीय परिवर्तन मोर्चाचे राष्ट्रीय संयोजक वामन मेश्राम होते. यावेळी बोलताना मेश्राम यांनी "बहुजन मुक्ती पार्टी देशात तिसऱ्या राजकीय शक्तीची निर्मिती करण्याच्या दिशेने काम करत आहे," असे प्रतिपादन केले. अधिवेशनाच्या प्रारंभी महाराष्ट्र राज्य प्रवक्ते आप्पासाहेब प्रेम गुप्ता यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन राज्य महासचिव संतोष विश्वकर्मा यांनी केले, तर आभार पुणे शहराध्यक्ष शतायुभाऊ बगळे यांनी मानले. कार्यक्रमाला राज्याध्यक्ष प्रताप पाटील, राज्य प्रभारी सचिन बनसोडे, राष्ट्रीय पदाधिकारी ॲड. विद्याताई त्रिरत्ने, राज्य युवाध्यक्ष दिपक शिंदे, महिला आघाडीच्या राज्यप्रभारी सुषमा मेहता, राज्याध्यक्षा हेमलता पाटील, राष्ट्रीय शीख मोर्चाचे राज्य प्रभारी हरविंदरसिंग खालसा, राष्ट्रीय मुस्लिम मोर्चाचे राज्याध्यक्ष हिजबुल रेहमान तसेच लहुजी क्रांती मोर्चाचे राज्य सल्लागार अंकलजी सोनवणे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. आयोजकांच्या माहितीनुसार, महाराष्ट्रातील ३६ जिल्हे आणि ३५८ तालुक्यांतील कार्यकर्त्यांनी अधिवेशनात सहभाग घेतला. महिलांची उपस्थितीही लक्षणीय होती. सभागृहाची आसनक्षमता पूर्ण झाल्याने अनेक कार्यकर्त्यांनी सभागृहाबाहेर उभे राहून भाषणे ऐकली. अधिवेशनात विविध वक्त्यांनी सामाजिक, राजकीय आणि



संघटनात्मक विषयांवर मार्गदर्शन केले. बहुजन समाजाचे संघटन, संविधानिक मूल्यांचे संरक्षण, सामाजिक न्याय आणि भविष्यातील राजकीय वाटचाल यासंदर्भात विविध मुद्द्यांवर मते व्यक्त करण्यात आली. वामन मेश्राम यांनी आपल्या भाषणात काँग्रेस आणि भाजपच्या कारभारावर टीका करत संविधानाच्या प्रभावी अंमलबजावणीची गरज अधोरेखित केली. तसेच बहुजन समाजाच्या राजकीय सक्षमीकरणासाठी व्यापक जनआंदोलन उभारण्याचे आवाहन केले.अधिवेशनाच्या अध्यक्षस्थानी राष्ट्रीय परिवर्तन मोर्चाचे राष्ट्रीय संयोजक वामन मेश्राम होते. यावेळी बोलताना मेश्राम यांनी "बहुजन मुक्ती पार्टी देशात तिसऱ्या राजकीय शक्तीची निर्मिती करण्याच्या दिशेने काम करत आहे," असे प्रतिपादन केले. अधिवेशनाच्या प्रारंभी महाराष्ट्र राज्य प्रवक्ते आप्पासाहेब प्रेम गुप्ता यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन राज्य महासचिव संतोष विश्वकर्मा यांनी केले, तर आभार पुणे शहराध्यक्ष शतायुभाऊ बगळे यांनी मानले. कार्यक्रमाला राज्याध्यक्ष प्रताप पाटील, राज्य प्रभारी सचिन बनसोडे, राष्ट्रीय पदाधिकारी ॲड. विद्याताई त्रिरत्ने, राज्य युवाध्यक्ष दिपक शिंदे, महिला आघाडीच्या राज्यप्रभारी सुषमा मेहता, राज्याध्यक्षा हेमलता पाटील, राष्ट्रीय शीख मोर्चाचे राज्य प्रभारी हरविंदरसिंग खालसा, राष्ट्रीय मुस्लिम मोर्चाचे राज्याध्यक्ष हिजबुल रेहमान तसेच लहुजी क्रांती मोर्चाचे राज्य सल्लागार अंकलजी सोनवणे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज

## दोंडाईचा उपजिल्हा रुग्णालयात मुख्यमंत्री जन-आरोग्य शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

### तज्ज्ञ डॉक्टरांकडून मोफत तपासणी, निदान, औषधोपचार व विविध आरोग्य सेवा

जन सम्राट टाईम्स

**दोंडाईचा । प्रतिनिधी:** दोंडाईचा येथील उपजिल्हा रुग्णालयात मुख्यमंत्री जन-आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले. सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत पार पडलेल्या शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. विविध आजारांची तपासणी, निदान, सल्ला, उपचार आणि औषध वितरणासह अनेक आरोग्य सेवांचा लाभ सुमारे ४०० रुग्णांनी घेतला. शिबिराचे उद्घाटन धुळे जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. रवीजी सोनावणे यांच्या मार्गदर्शनाखाली दोंडाईचा नगरपालिकेचे उपनगराध्यक्ष विजयभाऊ पाटील, सामाजिक कार्यकर्ते जितूभाऊ गिरासे, गटनेते निखिल जाधव, रुग्ण कल्याण समितीचे प्रविण




महाजन, जितेंद्र गिरासे, नगरसेवक हितेंद्र महाजन, ज्येष्ठ नागरिक के. एम. अग्रवाल, रवि अहिरे तसेच पत्रकार रणजित राजपूत यांच्या प्रमुख उपस्थितीत सरस्वती पूजन व दीपप्रज्वलन करून करण्यात आले. यावेळी उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. भरत कुलकर्णी यांनी उपस्थितांचे स्वागत करत शिबिराच्या उद्देशाची माहिती दिली. रुग्ण कल्याण समितीचे प्रविण महाजन यांनी एकाच छताखाली विविध आरोग्य सेवा उपलब्ध झाल्याने नागरिकांना योग्य निदान, सल्ला व उपचार मिळत असल्याचे सांगून अधिकाधिक रुग्णांनी लाभ घ्यावा, असे आवाहन केले. सामाजिक कार्यकर्ते जितूभाऊ गिरासे यांनी शासनाचा हा लोकहिताचा उपक्रम स्तुत्य असल्याचे सांगत अशा आरोग्य शिबिरांमुळे सर्वसामान्य नागरिकांना मोठा दिलासा मिळत असल्याचे नमूद केले. जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. रवीजी सोनावणे यांनी धुळे जिल्ह्यातील जिल्हा रुग्णालयाच्या अधिपत्याखालील सर्व दहा संस्थांमध्ये जन-आरोग्य शिबिरांचे आयोजन करण्यात आल्याची माहिती दिली. तसेच शिबिरात निदान झालेल्या कर्करोग व हृदयरोगग्रस्त रुग्णांसाठी जिल्हा रुग्णालयात शस्त्रक्रिया, अँजिओग्राफी आणि अँजिओप्लास्टीसारख्या उपचारांची सुविधा उपलब्ध असल्याचे सांगून नागरिकांनी आपले आरोग्य कार्ड काढून या सेवांचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले.

### नागरिकांना दर्जेदार आरोग्यसेवा उपलब्ध

शिबिरात औषध वाटप, लसीकरण, प्रयोगशाळा तपासणी, क्ष-किरण तपासणी, रक्तदाब व रक्तशर्करा तपासणी, ईसीजी, असंसर्गजन्य आजारांची नोंदणी व उपचार तसेच शस्त्रक्रियापूर्व तपासणी आदी विविध सेवा देण्यात आल्या. या शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी डॉ. सलमान कुरेशी, डॉ. अवनी पाटील, डॉ. तेजस जैन, डॉ. दर्शन पाटील, डॉ. मनीषा भावसार, डॉ. रुचिता पाटील, डॉ. युतीका भामरे, डॉ. पंकज राजपूत, डॉ. अश्विनी भामरे, डॉ. महाले, डॉ. गणेश खैरनार, डॉ. शुभांगी गजभिये, डॉ. अभिषेक पाटील, डॉ. स्नेहल पाटील, डॉ. युगंधरा शिसोदे आणि वरुण चौधरी यांच्यासह डॉक्टर, परिचारिका व आरोग्य कर्मचाऱ्यांनी विशेष योगदान दिले. कार्यक्रमाच्या शेवटी वैद्यकीय अधीक्षक डॉ. भरत कुलकर्णी यांनी उपस्थितांचे आभार मानले. भविष्यातही विविध प्रसंगी अशा आरोग्य शिबिरांचे आयोजन करून अधिकाधिक नागरिकांना दर्जेदार आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्याचा संकल्प यावेळी व्यक्त करण्यात आला.

# चिंचोली उपकेंद्रात 5 एमव्हीए अतिरिक्त ट्रान्सफॉर्मरचे लोकार्पण; सात गावांच्या वीजपुरवठ्याला मोठा दिलासा

## वीज म्हणजे शेतकऱ्यांच्या आयुष्यातील उजेड' – पालकमंत्री गुलाबराव पाटील



जन सम्राट टाईम्स

**जळगाव / पाळधी |** जळगाव तालुक्यातील चिंचोली येथील ३३/११ केव्ही वीज उपकेंद्रात मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना (एमएसकेव्हीवाय) २.० अंतर्गत उभारण्यात आलेल्या ५ एमव्हीए अतिरिक्त पॉवर ट्रान्सफॉर्मरचे लोकार्पण पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ना. गुलाबराव पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यामुळे चिंचोलीसह परिसरातील सात गावांतील शेतकरी, ग्रामस्थ आणि औद्योगिक ग्राहकांना अधिक सक्षम, अखंड व दर्जेदार वीजपुरवठ्याचा लाभ मिळणार आहे. यावेळी बोलताना पालकमंत्री गुलाबराव पाटील म्हणाले की, "दिवसा वीज म्हणजे शेतकऱ्यांच्या आयुष्यातील उजेड असून, शेतकऱ्यांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी शासन कटिबद्ध आहे. आधुनिक व विश्वासार्ह वीज व्यवस्था ही शेती, उद्योग आणि ग्रामीण विकासाचा भक्कम पाया आहे. उमाळा येथे जागा उपलब्ध झाल्यास डीपीडीसीच्या माध्यमातून नवीन वीज उपकेंद्र उभारण्यात येईल." त्यांनी सांगितले की, चिंचोली परिसरात उन्हाळ्यात वाढलेल्या वीजभारामुळे निर्माण होणाऱ्या अडचणी लक्षात घेऊन अतिरिक्त ट्रान्सफॉर्मर उभारण्याचे निर्देश देण्यात आले होते. महावितरणचे मुख्य अभियंता इब्राहिम मुलाणी आणि त्यांच्या पथकाने हे काम गुणवत्तापूर्ण पद्धतीने पूर्ण केल्याने चिंचोली, उमाळा, धानोरी, धानवड, देव्हारी, कुसुंबा आदी सात गावांतील ग्राहकांना मोठा दिलासा मिळणार आहे. महावितरणचे मुख्य अभियंता इब्राहिम मुलाणी यांनी सांगितले की, पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली शेतकरी व औद्योगिक क्षेत्राला अखंड, दर्जेदार आणि विश्वासार्ह वीजपुरवठा देण्यासाठी महावितरण कटिबद्ध असून, ग्राहकांच्या अडचणी तातडीने दूर करण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले जात आहेत. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अतिरिक्त कार्यकारी अभियंता व्ही. एस. कापुरे यांनी केले. प्रास्ताविकात कार्यकारी अभियंता दत्तात्रय साळी यांनी तालुक्यातील विविध वीज विकासकामांची माहिती देत अतिरिक्त ट्रान्सफॉर्मरमुळे परिसरातील वीजपुरवठा अधिक सक्षम आणि सुरळीत होणार असल्याचे सांगितले. आभार अधीक्षक अभियंता विनोद पाटील यांनी मानले. कार्यक्रमात परिसरातील सरपंच तसेच जळगाव ग्रामीण औद्योगिक असोसिएशनच्या वतीने पालकमंत्री गुलाबराव पाटील यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. या वेळी महावितरणचे अधिकारी, कर्मचारी, लोकप्रतिनिधी, ग्रामपंचायत सदस्य आणि शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### गरजा पूर्ण करण्यासाठी शासन कटिबद्ध

चिंचोलीसह परिसरातील सात गावांतील शेतकरी, ग्रामस्थ आणि औद्योगिक ग्राहकांना अधिक सक्षम, अखंड व दर्जेदार वीजपुरवठ्याचा लाभ मिळणार आहे. यावेळी बोलताना पालकमंत्री गुलाबराव पाटील म्हणाले की, "दिवसा वीज म्हणजे शेतकऱ्यांच्या आयुष्यातील उजेड असून, शेतकऱ्यांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी शासन कटिबद्ध आहे. आधुनिक व विश्वासार्ह वीज व्यवस्था ही शेती, उद्योग आणि ग्रामीण विकासाचा भक्कम पाया आहे. उमाळा येथे जागा उपलब्ध झाल्यास डीपीडीसीच्या माध्यमातून नवीन वीज उपकेंद्र उभारण्यात येईल.

# ISSF शूटिंग वर्ल्ड कपमध्ये भारताची सुवर्ण कामगिरी



जन सम्राट टाईम्स

**हाँगझोउ (चीन) |:** चीनमधील हाँगझोउ येथे सुरू असलेल्या ISSF शूटिंग वर्ल्ड कप स्पर्धेत भारताच्या महिला नेमबाजांनी शानदार कामगिरी करत देशाच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे. महिलांच्या २५ मीटर पिस्तूल प्रकारात ईशा सिंग हिने सुवर्णपदक, तर दुहेरी ऑलिम्पिक पदकविजेती मनू भाकर हिने कांस्यपदक पटकावत भारताला दुहेरी यश मिळवून दिले. ईशा सिंगने अंतिम फेरीत सुरुवातीपासूनच आघाडी कायम राखत दमदार प्रदर्शन केले. तिने ४० हिट्स नोंदवत चीनच्या झांग यूयुए हिला मागे टाकत सुवर्णपदकावर नाव कोरले. दबावाखालीही संयम आणि अचूकता कायम ठेवत ईशाने आणखी एक विश्वचषक विजेतेपद आपल्या नावावर केले.

भारताची स्टार नेमबाज आणि पॅरिस ऑलिम्पिकची दुहेरी पदकविजेती मनू भाकर हिनेही चुरशीच्या अंतिम फेरीत शानदार खेळ करत कांस्यपदक पटकावले. उपांत्य टप्प्यातील शूट-ऑफमध्ये प्रतिस्पर्ध्यावर मात करून तिने पोडियमवरील स्थान निश्चित केले. या दुहेरी पदकांमुळे आंतरराष्ट्रीय नेमबाजीमध्ये भारताचे वर्चस्व पुन्हा अधोरेखित झाले आहे.

जन सम्राट टाईम्स — ब्रेक न्यूज

# भडगाव पंचायत समितीच्या आढावा बैठकीत तक्रारींचा पाढा

## पाणी योजना आणि 'पोखरा' लाभावर प्रश्नचिन्ह



जन सम्राट टाईम्स

**भडगाव | प्रतिनिधी :** भडगाव पंचायत समितीत आमदार किशोर पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत तालुक्यातील विविध शासकीय विभागांच्या कामकाजाचा आढावा घेण्यासाठी बैठक पार पडली. या बैठकीत ग्रामसेवकांची मनमानी, अपूर्ण पाणीपुरवठा योजना, गोठा शेड, 'पोखरा' योजनेचा लाभ, जन्म-मृत्यू दाखले तसेच महसूल विभागाच्या कामकाजावर नागरिक व लोकप्रतिनिधींनी तीव्र नाराजी व्यक्त करत प्रशासनाला धारेवर धरले. बैठकीत वाडे गाव 'डार्क झोन'मध्ये असल्याने शेतकऱ्यांना गोठा शेड आणि 'पोखरा' योजनेचा लाभ मिळत नसल्याचा मुद्दा उपस्थित करण्यात आला. तसेच कनाशी ग्रामपंचायतीकडे सुमारे ₹४५ लाखांचा निधी उपलब्ध असूनही विकासकामे रखडली असल्याची तक्रार करण्यात आली. ग्रामसेवक नागरिकांशी मनमानी वर्तन करत असून गुन्हे दाखल करण्याच्या धमक्या देत असल्याचा आरोपही करण्यात आला. यावर गटविकास अधिकाऱ्यांनी संबंधित ग्रामसेवकाविरोधात कारवाई व बदलीबाबत सकारात्मक भूमिका घेतल्याची माहिती देण्यात आली. पांढरद येथील पाणीपुरवठा योजना कार्यकाळ संपूनही पूर्ण न झाल्याबद्दल संबंधित ठेकेदाराला तातडीने काळ्या यादीत (ब्लॅकलिस्ट) टाकण्याची मागणी करण्यात आली. पथराड येथे नियमित ग्रामसेवक नसल्यामुळे अनेक प्रशासकीय कामे रखडली असल्याची तक्रारही मांडण्यात आली. याशिवाय पथराड गावातील मंजूर रस्त्याच्या कामाला स्थानिकांचा विरोध होत असल्याचे सांगण्यात आले. नागरिकांना मृत्यू दाखले वेळेवर मिळत नसल्याची तक्रारही बैठकीत मांडण्यात आली. पिकांच्या नुकसानीचे पंचनामे करताना तलाठी व्ही. पी. शिंदे जबाबदारी टाळत असल्याचा आरोप करत त्यांच्या बदलीचा ठराव ग्रामपंचायतीने मंजूर केल्याची माहिती देण्यात आली. कजगाव येथे जन्मनोंदणी वेळेवर होत नसल्याबाबतही तक्रार करण्यात आली. तसेच महिला व बालविकास विभागाच्या कामकाजावरही उपस्थितांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले. बैठकीत विविध अपूर्ण शासकीय योजनांचा आढावा घेण्यात आला.

# जळगाव जिल्हा केमिस्ट संघटनेच्या अध्यक्षपदी सुनिल भंगाळे यांची बिनविरोध निवड!

## मनीष पाटील यांची जिल्हा कार्यकारिणीत बिनविरोध निवड



जन सम्राट टाईम्स

**पारोळा | प्रतिनिधी :** जळगाव जिल्हा केमिस्ट संघटनेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत संघटनेच्या अध्यक्षपदी लोकप्रिय, कर्तृत्ववान आणि गतिशील नेतृत्व म्हणून ओळख असलेले सुनिल भंगाळे यांची सभासदांच्या एकमताने बिनविरोध निवड करण्यात आली. ही सभा रविवारी (दि. २६ जुलै) केमिस्ट भवन येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. यावेळी उपाध्यक्षपदी संदीप बेदमुथा तर कोषाध्यक्षपदी दिनेश मालू यांचीही बिनविरोध निवड करण्यात आली. तसेच पारोळा येथील नगरसेवक मनीष पाटील यांची जिल्हा कार्यकारिणीवर बिनविरोध निवड झाल्याने पारोळा तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला आहे. निवडणूक प्रक्रियेदरम्यान भानुदास नाईक, सुरेंद्र बोहरा (पारोळा) आणि अशोक जैन यांनी निवडणूक अधिकारी व मार्गदर्शक म्हणून जबाबदारी यशस्वीपणे पार पाडली. नव्याने निवड झालेल्या पदाधिकाऱ्यांचा कार्यकाळ पुढील तीन वर्षांसाठी राहणार आहे सुनिल भंगाळे यांनी गेल्या २५ ते ३० वर्षांपासून संघटनेत विविध जबाबदाऱ्या सांभाळत जिल्हा केमिस्ट संघटनेच्या कार्याला सातत्याने दिशा दिली आहे. त्यांच्या कुशल नेतृत्व, संघटन कौशल्य आणि प्रभावी कार्यपद्धतीमुळे त्यांनी जिल्ह्यासह राज्यस्तरावरही वेगळी ओळख निर्माण केली असून त्यांच्या उल्लेखनीय कार्याचा गौरव विविध पुरस्कारांनी करण्यात आला आहे. सुनिल भंगाळे यांच्या अध्यक्षपदी झालेल्या बिनविरोध निवडीबद्दल जिल्ह्यातील केमिस्ट बांधव, संघटनेचे पदाधिकारी तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या.

# रेल्वेच्या कामामुळे सोनवद पाटचारीचे नुकसान

## दुरुस्तीच्या मागणीसाठी कापडणे येथील शेतकरी आक्रमक

जन सम्राट टाईम्स



**धुळे | प्रतिनिधी:** मनमाड–इंदोर रेल्वे मार्गाच्या सुरू असलेल्या कामामुळे सोनवद पाटचारीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचा आरोप करत कापडणे येथील शेतकऱ्यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे तात्काळ दुरुस्तीची मागणी केली आहे. पाटचारीची दुरुस्ती करून कापडणे परिसरातील सिंचनाचा प्रश्न त्वरित मार्गी लावावा, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही शेतकऱ्यांनी दिला आहे. शेतकऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, गेल्या अनेक वर्षांपासून मनमाड–इंदोर रेल्वे मार्गाचे काम सुरू असून या कामादरम्यान कापडणेसह परिसरातील गावांना पाणीपुरवठा करणाऱ्या सोनवद पाटचारीचे मोठे नुकसान झाले आहे. त्यामुळे कापडणेसह पंचक्रोशीतील शेतकऱ्यांसमोर सिंचनाचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. या संदर्भात सिंचन विभागाकडे अनेक वेळा तक्रारी करूनही दुरुस्तीचे काम सुरू झाले नसल्याने संतप्त शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने केली. त्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देत पाटचारीची तातडीने दुरुस्ती करण्याची मागणी करण्यात आली. लवकरात लवकर दुरुस्तीचे काम हाती घेऊन पाणीपुरवठा सुरळीत करण्यात यावा, अन्यथा व्यापक आंदोलन करण्यात येईल, असा इशारा शेतकऱ्यांनी प्रशासनाला दिला. या आंदोलनात शरद पाटील, नवल पाटील, भगवान पाटील, योगेश पाटील, संजय जैन, भूषण बामणे, गणेश सैंदाणे, मनोहर माळी, काशिनाथ भिल, सतीश पाटील, दीपक पाटील, धीरज पाटील यांच्यासह कापडणे गावातील शेतकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.शेतकऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, गेल्या अनेक वर्षांपासून मनमाड–इंदोर रेल्वे मार्गाचे काम सुरू असून या कामादरम्यान कापडणेसह परिसरातील गावांना पाणीपुरवठा करणाऱ्या सोनवद पाटचारीचे मोठे नुकसान झाले आहे. त्यामुळे कापडणेसह पंचक्रोशीतील शेतकऱ्यांसमोर सिंचनाचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. या संदर्भात सिंचन विभागाकडे अनेक वेळा तक्रारी करूनही दुरुस्तीचे काम सुरू झाले नसल्याने संतप्त शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शने केली. त्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देत पाटचारीची तातडीने दुरुस्ती करण्याची मागणी करण्यात आली. लवकरात लवकर दुरुस्तीचे काम हाती घेऊन पाणीपुरवठा सुरळीत करण्यात यावा, अन्यथा व्यापक आंदोलन करण्यात येईल, असा इशारा शेतकऱ्यांनी प्रशासनाला दिला.

# खनोराच्या विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती परीक्षेत घवघवीत यश

जन सम्राट टाईम्स



**खनोरा। प्रतिनिधी:** महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या शिष्यवृत्ती परीक्षेत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, खनोरा येथील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन करत शाळेच्या शैक्षणिक परंपरेत आणखी एक मानाचा तुरा खोवला आहे. विद्यार्थ्यांच्या या यशामुळे संपूर्ण गावात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. या परीक्षेत शाळेतील आराधना खंडाते, रुद्र खंडाते, नक्ष मोरघडे, प्रज्वल कंगाले, अंश सुहागपुरे, आस्था ईनवाते, तन्नु सलामे, हेमंत मोरघडे, देवांश मोरघडे, माही कंगाले आणि मानसी सलामे या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट यश मिळवून शाळेचा नावलौकिक वाढविला. विद्यार्थ्यांचे हे यश त्यांच्या सातत्यपूर्ण अभ्यासाचे, पालकांच्या प्रोत्साहनाचे आणि शिक्षकांच्या योग्य मार्गदर्शनाचे फलित असल्याचे शाळेच्या वतीने सांगण्यात आले. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल शाळा व्यवस्थापन समिती, ग्रामस्थ, मुख्याध्यापक दिपक बोरसे तसेच सर्व सहायक शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यशस्वी विद्यार्थ्यांनी जिल्हा परिषद शाळांमधील गुणवत्तापूर्ण शिक्षणाची परंपरा कायम ठेवत इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी आदर्श निर्माण केला आहे

# १५ दिवसांत पीक विमा जमा करा, अन्यथा उपोषण!

## पारोळ्यात शेतकरी संघटनेचा इशारा



जन सम्राट टाईम्स

**पारोळा | प्रतिनिधी :** खरीप २०२५ हंगामातील पीक विमा नुकसानभरपाई तातडीने शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करावी तसेच नियमित पीक कर्जाची परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना अहिल्याबाई होळकर कर्जमाफी योजनेअंतर्गत ₹२ लाखांचे प्रोत्साहन अनुदान द्यावे, या प्रमुख मागण्यांसाठी शेतकरी संघटना, पारोळा यांच्या वतीने तहसीलदार उल्हास देवरे यांना निवेदन देण्यात आले. निवेदनात म्हटले आहे की, खरीप २०२५ हंगामात तालुक्यातील शेतकऱ्यांनी कापूस, मका, ज्वारी, बाजरी, उडीद, मूग आदी पिकांचा पीक विमा भरला होता. मात्र ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. त्यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक फटका बसला असून अद्यापही अनेकांना विमा नुकसानभरपाई मिळालेली नाही. शेतकरी संघटनेने शासनाकडे मागणी केली आहे की, पीक विम्याची थकीत नुकसानभरपाई तातडीने वितरित करावी. खरीप २०२५ हंगामातील पीक विमा नुकसानभरपाई तातडीने शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करावी तसेच नियमित पीक कर्जाची परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना अहिल्याबाई होळकर कर्जमाफी योजनेअंतर्गत ₹२ लाखांचे प्रोत्साहन अनुदान द्यावे, तसेच नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना जाहीर केलेले ₹२ लाखांचे प्रोत्साहन अनुदानही लवकरात लवकर मंजूर करून वितरित करण्यात यावे. संघटनेने प्रशासनाला १५ दिवसांचा अल्टिमेटम देत, या कालावधीत मागण्यांची पूर्तता न झाल्यास तहसील कार्यालयासमोर बेमुदत उपोषण आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही निवेदनाद्वारे दिला आहे. शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर तातडीने निर्णय घेऊन त्यांना न्याय द्यावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

# चढ्या दराने खतविक्री करणाऱ्यांवर गुन्हे दाखल करा - पालकमंत्री गुलाबराव पाटील

## धरणगावातील शेतकऱ्यांच्या तक्रारींची गंभीर दखल; पी. एम. पाटील यांनी मांडल्या समस्या

जन सम्राट टाईम्स



**धरणगाव| प्रतिनिधी :** धरणगाव शहरासह तालुक्यात युरिया व इतर कृषी निविष्ठांची शासनाने निश्चित केलेल्या दरापेक्षा अधिक दराने विक्री होत असल्याच्या शेतकऱ्यांच्या तक्रारींची पालकमंत्री तथा राज्याचे पाणीपुरवठा मंत्री ना. गुलाबराव पाटील यांनी गंभीर दखल घेत संबंधित अधिकाऱ्यांना कठोर कारवाईचे आदेश दिले आहेत. चढ्या दराने खते, बियाणे किंवा कृषी साहित्याची विक्री करणाऱ्या विक्रेत्यांविरुद्ध तातडीने गुन्हे दाखल करण्याचे निर्देश त्यांनी दिले. धरणगाव येथे आयोजित शासकीय कार्यक्रमादरम्यान शिवसेनेचे ज्येष्ठ नेते पी. एम. पाटील, तालुकाप्रमुख डी. ओ. पाटील आणि उपतालुकाप्रमुख मोतीआप्पा पाटील यांनी पालकमंत्र्यांची भेट घेऊन तालुक्यातील शेतकऱ्यांच्या विविध अडचणी मांडल्या. विशेषतः काही विक्रेत्यांकडून युरियाची कृत्रिम टंचाई निर्माण करून जादा दराने खतविक्री होत असल्याचा मुद्दा त्यांनी ठामपणे उपस्थित केला. शेतकऱ्यांच्या तक्रारी ऐकल्यानंतर पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी कृषी विभागाला तातडीने कारवाईचे आदेश देत, "जळगाव जिल्ह्यातील कोणत्याही शेतकऱ्यावर अन्याय होऊ देणार नाही. शासनाने निश्चित केलेल्या दरापेक्षा अधिक दराने खते, बियाणे किंवा इतर कृषी साहित्य विक्री करताना कोणी आढळल्यास संबंधित विक्रेत्यांविरुद्ध त्वरित गुन्हे दाखल करण्यात यावेत," असे स्पष्ट निर्देश दिले

### प्रत्यक्ष कारवाईकडे सर्वांचे लक्ष लागले

यावेळी उपस्थित असलेले जिल्हाधिकारी रोहन घुले यांनीही प्रकरण गांभीर्याने घेत कृषी विभागाला तपासणी मोहीम राबविण्याचे आदेश दिले. खतविक्री केंद्रांची तपासणी, साठ्याची पडताळणी तसेच दरफलकांची पाहणी करून नियमभंग करणाऱ्यांवर कारवाई करण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. दरम्यान, पी. एम. पाटील यांनी धरणगाव तालुका गुणवत्ता अधिकारी परेश बडगुजर यांच्याशी स्वतंत्र चर्चा करून शेतकऱ्यांच्या तक्रारींची तातडीने नोंद घेऊन त्यावर प्रभावी कारवाई करण्याची मागणी केली. तसेच खत, बियाणे किंवा कृषी साहित्याबाबत कोणतीही तक्रार असल्यास शेतकऱ्यांनी प्रशासनाशी थेट संपर्क साधावा, असे आवाहनही त्यांनी केले. खरीप हंगामात युरियाची मागणी वाढलेली असताना जादा दराने खतविक्री होत असल्याच्या तक्रारींमुळे शेतकऱ्यांमध्ये नाराजी होती. पालकमंत्र्यांच्या कठोर आदेशांनंतर प्रशासनाने तातडीने हालचाली सुरू केल्याने शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले असून, आता दोषींवर होणाऱ्या प्रत्यक्ष कारवाईकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

Printed, published and Owned by Mukundrao Shamrao Nannaware, and printed at Shri Samarth Krupa Digital Printers, Plot No. 16. S.R. No.39/1 Sadguru Nagar, MIDC Jalgaon-425001 and published at 2nd FLOOR, BALAJI SANKUL, NEAR KHAJAMIYA CHOUK, JALGAON (MS.) PIN - 425001, Editor - Mukundrao Shamrao Nannaware Title Code - T/MH/2026/0422/5204/1306